# मराठीचा उत्कर्ष - कसा करावा?

- प्रा. मनोहर राईलकर

दि. १५-११-२००९च्या लोकमुद्रा पुरवणीमध्ये श्री. सलील कुलकर्णींचा 'हिंदी ही राष्ट्रभाषा? एक चकवा' अशा शीर्षकाचा एक अभ्यासपूर्ण लेख आला आहे. आणि त्यावर दि. २९-१२-२००९च्या लोकमुद्रामध्येच पुष्कळ प्रतिसाद-पत्रंही आली आहेत. तो उदंड प्रतिसाद पाहून आनंद झाला. आपल्या बंधुभगिनींच्या मनात मराठीबद्दल किती अभिमान आहे, याचं प्रत्यंतर आलं. हे चित्र मोठंच आशादायक आहे. तो प्रतिसाद म्हणजे हिमनगाचं टोक असेल, तर मराठीचा अभिमानी असा प्रचंड अदृश्य डोंगर खाली असेल, असंही वाटलं.

मात्र, आलेला हा प्रतिसाद असाच बोलघेवडेपणानं वाया घालवण्याऐवजी त्यातून मायबोलीच्या उत्कर्षाच्या दृष्टीनं काही भरीव असं रचनात्मक काम आपण केलं तरच खरं. म्हणून हा प्रतिसाद संघटित करून आपण आपल्या भाषेचा उत्कर्ष साधला तर श्री. कुलकर्णींच्या लेखनाचा आणि आपल्या सर्वांच्याच मनात असलेल्या भाषाभिमानाचा विधायक उपयोग केल्यासारखं होईल. अपत्यानं जगात झेंडा लावला की त्याचे आईवडील आपोआपच मोठे होतात. तसंच आपण मराठीचीं अपत्यं. आपल्या प्रयत्नांनीच आपली मायबोलीही मोठी होईल, अशी माझी भावना आहे. आणि 'हिला बैसवू वैभवाच्या शिरी,' ही माधव ज्यूलियनांची आसही सफळ होईल.

श्री० कुळकर्णींच्या लेखावर आलेल्या सर्व प्रतिसादपत्रांत श्री० समीर जोशींचा पत्र सर्वांत उजवं आहे, असं माझं मत झालं. कारण, तात्त्विक चर्चेपेक्षा ते विधायक सूचनांनी भरलेलं आहे.

त्यांनी निरनिराळ्या प्रकारच्या एकूण २७ सूचना केल्या आहेत. त्यांच्यात आणखी काही मुद्द्यांची भर घालता येईल, असं ते म्हणतातच तर, मी थोडी भर घालू इच्छितो.

(२८) सरकारनं मराठी शाळांचं वेतनेतर अनुदान २००४-०५ सालापासून, म्हणजे पाचसहा वर्षं थकवलं आहे. त्यातच विद्यार्थ्यांची संख्या रोडावल्यामुळं डबघाईस आलेल्या शाळांनी आपला कारभार कसा चालवायचा? तरी हे अनुदान ताबडतोब दिलं जावं. आणि ह्यापुढं तरी ते थकवणाऱ्या अधिकाऱ्याला जाब विचारला जावा, प्रसंगी टप्प्याटप्प्यानं शिक्षाही व्हावी. (२९) सर्व प्रपत्रं मराठीतच असावीत. तशी एक किंवा दोन महिन्यांची मुदत देऊन संबंधित अधिकाऱ्यांना तशी करून घेण्यास भाग पाडावं. हे भाषांतर हिंदी किंवा इंग्रजी वळणाचं होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी. (३०) सरकारी आयोगांचे, समित्यांचे वृत्तांत प्रथम मराठीतच सादर केले जावेत. मराठीत आयोग सादर करण्याच्या शपथपत्रावरच संबंधित अधिकाऱ्याची नियुक्ती केली जावी. (३१) पावत्या, हिशेबपत्रं, ताळेबंद, इत्यादी सर्व कागद मराठीतच असावेत. (३२) श्री० जोशींच्या क्र० (२१) च्या सूचनेला मी थोडी दुरुस्ती सुचवतो. कोणतीही माध्यमिक शाळा २ किमीच्या आत असावी आणि प्राथमिक शाळा अर्धा किमीच्या आत असावी. म्हणजे बालकांचा जाण्यायेण्यातला वेळ वाचेल, त्यांना खेळाकरता आणि आपापले छंद जोपासण्याकरता अधिक वेळ मिळेल. (३३) मराठी शाळांतही वर्गातली संख्या ३०-४०च्या पेक्षा अधिक असू नये. त्याकरता लागणारे अधिक वर्ग उघडण्याकरता सर्व प्रकारचे (खोल्यांचे बांधकाम, वाढत्या शिक्षकांच्या नेमणुकी, शैक्षणिक साहित्य, इ०करता) पूर्ण अनुदान द्यावं. (३४) महाराष्ट्रात विकावयाच्या कोणत्याही उत्पादनावरील कोणत्याही प्रकारच्या (वापरण्याच्या, धोक्याच्या) सूचना प्रथम मराठीत असल्याच पाहिजेत. त्याखाली आणखी कोणत्या भाषेत, असायला हरकत नाही. (३५) विविध कंपन्यांकडे मराठीत पृच्छा केली तरी उत्तर मराठीत मिळत नाही. तशा कंपन्यांना चाप लावावा. (तो विविध प्रकारे लावता येईल. (सूचना, कारणे दाखवा सूचना, दंड, परवाना रद्द करणे, मुदतीपुरती बंदी, कायमची बंदी इ० टप्प्यांनी). (३६) विधानसभा व विधान परिषदेमधील भाषणं फक्त मराठीतच असावीत. (३७) पुष्कळदा उपकलमांकरता वापरण्यात येणारी अक्षरं अ, ब, क, ड. असतात. हा मराठीचा क्रम नव्हे. ती अक्षरं इंग्रजीचं भाषांतर केलेली आहेत. तेव्हा तो क्रमही मराठीप्रमाणे म्हणजे आ, आ, इ, ई, किंवा क, ख, ग, घ, इत्यादी, असाच असावा.

मी केलेल्या ह्या सूचना काय किंवा श्री० जोशींनी केलेल्या सूचना काय, त्या सर्व सरकारनं काय करावं, हे सांगणाऱ्या आहेत. आता प्रश्न असा आहे की आपण काय करणार? कारण, कोणतंही सत्कार्य स्वतःपासून सुरू करावं, असं म्हणतात. त्याबाबत दोन दिशांनी विचार करता येईल. (अ) मराठीचा उत्कर्ष होण्यासाठी मराठी व्यक्ती म्हणून आपण काय करणार, (आ) सरकारनं वरील सूचना अमलात आणाव्यात, ह्याकरता मराठी समाज म्हणून आपण काय करणार. आपण दोन्हींचा विचार करू.

(अ) पहिली कृती म्हणजे दुसऱ्या कुणाला काही सांगण्याऐवजी स्वतःची भाषा सुधारणं. 'म्हणजे आम्ही काय गावंढळ भाषा बोलतो, असं तुम्हाला म्हणायचंय की काय?' असं तुम्हाला वाटेल. मी म्हणेन, एक वेळ आपण गावंढळ भाषा बोललो तरी चालेल. कारण ती स्वभाषा आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांची भाषा आहे. गाडगेमहाराजांची आणि बहिणाबाईंची भाषा आहे. पण, अर्धवट मराठी आणि अर्धवट इंग्रजी अशी, किंवा हिंदी-इंग्रजीनं जिला रक्तबंबाळ केलं आहे, अशी भाषा अगदी तत्काळ बंद केली पाहिजे. अगदी आजपासून, आत्तापासून. मराठी बोलताना अनावश्यक इंग्रजी शब्द घुसडणं बंद केलं पाहिजे. हे काम अगदी सोपं आहे.

असल्या शब्दांचे आपण तीन गट करू. (१) मुळात मराठीत शब्द उपलब्ध असतानाही इंग्रजी शब्दांचा उपयोग केला जातो असे शब्द, (२) ज्या कल्पना आणि संज्ञा मराठीत नव्हत्या आणि ज्या आपण इतरांकडून सरळ सरळ आयात केल्या आहेत, त्यांच्याकरता वापरण्यात येणारे शब्द, (३) विज्ञानातल्या चिन्हं-संकल्पना-संज्ञांकरता लागणारे शब्द-खुणा.

शब्द असा शब्द असला तरी शब्दप्रयोग, वाक्प्रयोग, वाक्यरचना, चिन्हं असे सगळे प्रकार अभिप्रेत आहेत.

ह्याबद्दल आपणच काही कालमर्यादा आखून घ्यावी.

(१) ह्या गटातल्या कल्पनांकरता आपण निष्कारण इंग्रजी शब्दांची योजना करून भाषा बिघडवतो. उदाहरणार्थ, महिला नवऱ्याबद्दल बोलताना माझे मिस्ट(ष्ट)र असा शब्द का वापरतात. अमुक एक मुलगा किंवा मुलगी आमच्या ग्रुपमधली नाही, असं का म्हणतात, ते मला कळलं नाही. असे कित्येक.

वरील गटात न बसणारं असंही काही आपण बोलतो. हिंदी वळणाचं किंवा इंग्रजी वळणाचं. ते पाहू. कित्येकदा आपण इंग्रजी किंवा हिंदी वळणाची वाक्यरचना करतो. मी तुझी मदत करू शकणार नाही, हे हिंदी. आणि तो म्हणाला की तो आज येणार नाही, हे इंग्रजी वळणाचं म्हणजे 'इनडायरेक्ट' रचनेचं वाक्य. वक्ते त्यांच्या भाषणात म्हणाले, हे इंग्रजी. मी त्याला एक पुस्तक दिलं. जे माझं स्वतःचं होतं. हे हिंदी. इथं 'तुझी' च्या जागी 'तुला', दुसऱ्या 'तो' च्या जागी 'मी', 'त्यांच्या, च्या जागी 'आपल्या', आणि 'मी त्याला माझं स्वतःचं पुस्तक दिलं', ह्या मराठी रचना होत.

सांगायचा उद्देश असा की, आपण हा प्रकार तत्काळ बंद करावा. इंग्रज येण्यापूर्वी महिला पतीचं नाव उच्चारीत नसत. ते योग्य की अयोग्य, हा मुद्दा नसून तशी प्रथा होती. तरीही नवऱ्याचा उल्लेख करताना मालक, कारभारी, धनी, किंवा इकडे अशासारखे शब्द योजीत. तसे योजावेत, असं मी सुचवीत नसून, पती, यजमान, श्रीयुत अशासारखे शब्द वापरणं सुरू करावं. आणखी काही उदाहरणं देण्याची आवश्यकता आहे, असं वाटत नाही. आपण सारे समंजस आहात. एक शक्यता आहे. कोणताही बदल करायचा म्हटलं की त्याची टिंगल होण्याची पुष्कळ शक्यता असते. तशा टिंगलीला आपण निडरपणं तोंड ध्यायला हवं. कारण, बराचसा समाज बहुमताकडे झुकणारा असतो. आपलं बहुमत झालं की टिंगल करणारा गटही आपल्याला मिळेल आणि दुसऱ्यांची टिंगल करू लागेल. तोवर धीरानं रेटत राह्यला हवं.

(२) दुसऱ्या गटाबद्दल काही मतभेद असू शकतील. उदाहरणार्थ, स्कूटर, मोटार, रेलवे, टेलिफोन इत्यादी वस्तू आपल्याकडे नव्हत्याच. त्यांच्याकरता आपल्यापुढं दोन पर्याय आहेत. एक म्हणजे त्यांच्याकरता चांगले चपखल प्रतिशब्द उपलब्ध करता आले, तर ते करावेत, सुचवावेत, त्यांचा एक कोश करण्याचं काम राज्य मराठी विकास संस्था यासारख्या मराठी विद्वानांच्या संस्थांनी करावं. कोणीही प्रतिशब्द सुचवावेत आणि या संस्थांनी त्यांचा अभ्यास करून कोणता तरी एक वा अनेक चपखल प्रतिशब्द मान्य करून प्रसिद्ध करावेत. अथवा दुसरा पर्याय, जसेच्या तसे इंग्रजी प्रतिशब्द वापरावेत.

काही उदाहरणांनी मी हे स्पष्ट करतो. टेलिफोन, मोबाईल ह्या कल्पना आपण आयात केल्या आहेत. त्यांच्याकरता निरनिराळे लोक निरनिराळे शब्द वापरतात. टेलेफोनकरता दूरध्वनी, दूरभाष, मोबाईल-करता भ्रमणध्वनी, चलध्वनी, म्हणतात. लँडलाईनकरता स्थलध्वनी किंवी स्थिरध्वनी, कॉम्प्यूटरला संगणक, इत्यादी. ह्या बाबतीत मी स्वतः आग्रही नाही. ज्यांना ते वापरायचे असतील त्यांनी ते अवश्य वापरावेत. पण ज्यांना ते वापरायचे नाहीत, त्यांनी ते वापरणाऱ्यांची टिंगल करण्याचं कारण नाही. कदाचित ते हळू हळू रूढ होतीलही. आणि डार्विनच्या सिध्दांताप्रमाणं जो चांगला शब्द असेल तो टिकेल.

(३) तिसऱ्या गटाबद्दल. डॉ. रघुवीरांनी A Comprehensive English-Hindi Dictionary of Scientific Terms अशा नावाचा, सर्व भाषांना चालणारा एक कोश तयार केला होता. पण आपण (म्हणजे कुणी, ह्या वादात शिरण्याचं हे स्थळ नव्हे) त्यांच्या कामाकडे दुर्लक्ष केलं. परिणामी त्यांचे कष्ट वाया गेले. देशाचा पैसा वाया गेला. आणि आपण रेसभरही प्रगती केली नाही. जर कोठारी आयोगाच्या सूचनेप्रमाणं त्याच वेळी आपण धाडसानं भाषामाध्यमात बदल केला असता तर विज्ञानात लागणारे, डॉ० रघुवीरांनी सुचवलेले शब्दही आपण मराठीत (आणि अर्थातच सर्व भाषांत) सुलभतेनं वापरू शकलो असतो. पण आता प्रत्येक भारतीय भाषेनं स्वतःकरता शब्द तयार करायचे म्हटलं तर गोंधळ होईल आणि 'बघा आम्ही म्हणत नव्हतो की इंग्रजीच माध्यम ठेवायला हवं होतं. आता झाले की नाही देशाचे तुकडे,' असं म्हणणाऱ्यांची तोंडं वाजू लागतील. म्हणून ते शब्द तसेच्या तसेच ठेवावेत. त्यांच्याकरता नवीन कोश तयार करण्यात पैसा आणि शक्ती खर्च करू नये.

शिवाय, त्यांचा उपयोग करण्याचा एक लाभ नक्की आहे. तो म्हणजे जुजबी इंग्रजी येऊनसुद्धा इंग्रजी पुस्तकं वाचताना त्यांना फारशी अडचण येणार नाही. परिणामी इंग्रजी माध्यमच स्वीकारण्यामागची एक मोठी सबब नाहीशी होईल.

आपल्याच भाषेला ओरबाडणाऱ्या मंडळींत, वृत्तपत्रं, दूरदर्शन वाहिन्या, सरकारी व खासगी कंपन्या असे विविध शक्तिशाली गट आहेत. त्यांच्याशी लढा देण्याकरता आपल्याला आपली, म्हणजे मराठी-अभिमान्यांची एक प्रभावी संघटना उभारावी लागेल. कशी?

मी एक उदाहरण देतो. अगदी नाव घेऊन देतो. कारण इतर अनेकांप्रमाणं मला ते सारं असह्य होत आलं आहे. आयडिया कंपनीचा सारेगम हा कार्यक्रम. बोलणाऱ्या मंडळींचं इंग्रजीनं फाडलेलं मराठी ऐकून मला संताप व उबग येतो. अगदी मान्यवर, श्रीधर फडके, अवधूत गुप्ते, वैशाली सामंत, देवकी पंडीत, संजीव अभ्यंकर आणि कहर म्हणजे स्वतः सूत्रधार पल्लवी जोशी. परिणामी इतका चांगला कार्यक्रमही मी अनेकदा ऐकत नाही. ऐकू शकत नाही. ह्यांच्या बोलण्याचा परिणाम म्हणून मुलंही धन्यवाद किंवा आभारी आहोत, असं म्हणण्याऐवजी थँक्यू म्हणतात. आजवर मला फक्त दोनच लोक खऱ्या मराठीत बोलणारे आढळले. एक म्हणजे श्री. उमप आणि दुसरे पं. हृदयनाथ मंगेशकर. हे दोघे कटाक्षानं एकही इंग्रजी शब्द न वापरता बोलत (बोलू शकत) असल्याचं पाहून आनंद झाला. (म्हणजे मराठीत बोलता येतं की!) ह्याला उपाय काय? उपाय आहे. आपण जर संघटितपणं तो लागू केला तर, त्याचा परिणाम तत्काळ होईल. त्याकरता आयडियाचा चलध्वनी वापरणाऱ्या मराठी अभिमान्यांना आवाहन करून त्यांची एक विस्तृत यादी करायची. आणि आयडिया कंपनीला कळवायचं, 'आम्हाला तुमच्या कार्यक्रमात होणारी मराठीची अवहेलना सुतराम् मान्य नाही. ती जर तत्काळ थांबवली नाहीत तर, आता येत असलेल्या नव्या सुविधेचा उपयोग करून आम्ही तुमची सेवा बंद करून दुसऱ्या कंपनीची सेवा घेण्याचा निर्णय करीत आहोत. तुम्हाला अमुक इतकी मुदत दिली आहे.'

सर्व कंपन्यांचा प्राण पैशात असतो. त्यांचा एकमेव उद्देश, पैसा मिळवणं. त्याकरता ते काहीही करायला तयार होतील. जर दहावीस हजार, सुरुवातीला निदान हजार लोकांची ई-पत्रं कंपनीला गेली तर वर नावं घेतलेल्या सर्वांचं मराठी लागलीच सुधारेल. बोला, आहात का तयार? विजापूरच्या बादशहानं शहाजीराजांना अटक केल्यावर शिवाजीराजांनी औरंगजेबाला पत्र लिहिलं. त्यानंतर विजापूरकरांची जशी हबेलंडी उडाली तसं आयडियाचं होईल.

माझं हे स्वप्नरंजन नाही. डॉ. श्रीपाद पांडे (ॲक्सिस बँक) आणि कौशल इनामदार (व्होडाफोन) ह्या एकेकटयांनीसुद्धा इंगा दाखवल्यावर संबंधित मंडळींनी तत्काळ त्यांच्या पायाशी लोळण घेतली.

आयडियाच्या कार्यक्रमाचं मी एक उदाहरण घेतलं. तशा प्रकारे कित्येक मालिकांत मराठीचे हाल चालू असतात. ही मिजास प्रायोजकांच्या जाहिरातीतून मिळणाऱ्या पैशावरच चालते. त्यांचे आणि प्रायोजकांचेही प्राण पैशातच असतात. तर वरच्याप्रमाणं आपण प्रायोजकांना पत्र लिहायचं, 'अमुक कार्यक्रमात निष्कारण मराठी बिघडवण्याचं काम होत असलेलं आढळतं. ते थांबलं नाही, तर आम्ही तुमची उत्पादनं विकत घेणार नाही.' पुन्हा, अशी दहावीस हजार पत्रं गेली तर लागलीच यश येईल, हे विसरायचं नाही. ही कल्पना माझी नव्हे. चेन्नैमधील लोकांनी ह्याच मार्गानं स्टार वाहिनीवरील आपल्या भाषेची परवड बंद करवली.

मीही एकट्यानं हा प्रयोग केला तरी मला यश मिळालं. कसं? एका नियतकालिकात अश्लील आणि बीभत्स कविता प्रसिद्ध होत असत. मी नियतकालिकाचा वर्गणीदार होतो. मी संपादकांना पत्र लिहून विनंती केली. त्यावर त्या कवीनं केलेली काही संपादणी संपादकांनी प्रसिद्ध केली. मग मी संपादकांना दुसरं पत्र लिहिलं, 'काय लिहावं, हा त्या कवींचा प्रश्न आहे. काय छापावं हा तुमचा प्रश्न आहे. पण काय विकत घ्यावं हा माझा प्रश्न आहे. तेव्हा मी तुमच्या नियतकालिकाची वर्गणी आता भरणार नाही.' पुन्हा त्या कवीच्या कवितांना स्थान मिळालं नाही! कदाचित आणखीही काही जणांनी माझ्याप्रमाणं युक्ती केली असेल! मला माहीत नाही.

(आ) (आता सरकारला कसं करायला लावायचं तिकडे वळू यात. जसा कंपन्यांचा प्राण पैशात असतो, तसा आमदाराचा प्राण सत्तेत, म्हणजे खुर्चीत असतो. आपली खुर्ची जाईल, अशी भीती त्यांना वाटली तर ते तुमचं कसलंही म्हणणं मान्य करतील. मग काय करायचं? कोणत्या तरी संघटनेच्या (आपल्याला काय, कुणाच्याही कोंबड्यानं उजाडू द्या) माध्यमातून हे घडवायचं. पण, संघटना हवीच. (मराठी उत्कर्ष मंडळ?) तर मतदारसंघानुसार आपल्याही संघटना हव्यात. मतदार संघातल्या मराठी आमदाराला गाठायचं. आपलं म्हणणं (वर मांडलेल्या ३७ सूचना), सरकारला लागू असलेल्या सूचनांची मागणी (आदेश?) त्यांना द्यायची. आणि असं सांगायचं, 'तुम्ही आता चारपाच वर्षं आमदार राहणार आहात. तेव्हा ही कामं होतील अशी व्यवस्था करा. कशी ते तुम्ही ठरवा.' हे स्मरण त्यांना शांतपणं आणि ठामपणं, तोल जराही ढळू न देता, वेळोवेळी देत राह्यचं. आणि अमुक मुदतीत ही कामं झाली नाहीत, तर पुढच्या वेळी तुम्ही निवडून येणार नाही, याची व्यवस्था आम्ही करू, असा सभ्य पण योग्य शब्दांत सज्जड दम भरायचा. मात्र सर्व काम शिवाजीराजांच्या कौशल्यानं झालं पाहिजे. अगदी बारकाईनं योजना आखून आणि पूर्ण शक्तीनिशी. आपण सर्व मराठी बंधुभगिनींनी सर्व शक्ती लावली तर हा जगन्नाथाचा रथ आपण शेवटपर्यंत ओढून नेऊच नेऊ. काय? पटतंय का? तर हात मिळवा. आणि मग? माधव ज्यूलियन म्हणतात तसं:

मराठीला बैसवू(च) वैभवाच्या शिरी.

■ ■ ■